॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ४ (प्रितिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाच्यावतीने योगायुर्वेद थेरपि युनिटच्या माध्यमातुन विविध चिकित्सा पध्दती सुरू केली असून अवघ्या दहा महिन्यात २०९ जणांनी या चिकित्सा पध्दतीचा लाभ घेतला आहे.

विद्यापीठात काही वर्षापूर्वी योग मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले होते. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी हे स्वत: योगाच्या प्रसार व प्रचारासाठी आग्रही असल्यामुळे या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळे अंतर्गत योगशास्त्र विभाग सुरू करण्यात आला. एम.ए योगशास्त्र हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. योगशास्त्र विभागाच्या माध्यमातुन अत्याधुनिक असे योगायुर्वेद थेरपि युनिट सुरू करण्यात आले आहे. स्वास्थ्य संवर्धन व रोग निवारणासाठी पाच भारतीय वैद्यकीय पध्दतीपैकी आयुर्वेदातील पंचकर्म व योगशास्त्रातील षटकर्म यांचा मेळ साधुन शिरोधारा, बॉडी मसाज, स्टीमबाथ, बस्ती, नस्य, वमन, जलनेती, सुत्रनेती, कपालभाती, अग्निसार यासारख्या चिकित्सा पध्दती सुरू करण्यात आल्या आहेत. या युनिटमध्ये अत्याधुनिक उपकरणे आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठातील कर्मचा-यांसोबत बाहेरील व्यक्तीनाही या चिकित्सा पध्दतीचा लाभ घेता येतो. फुल बॉडी मसाज स्टीमबाथसह यासाठी ३०० रूपये, शिरोधारासाठी १५० रूपये, वमन ६० रूपये, नस्य ४० रूपये व जलनेती ४० रूपये या प्रकारचे अत्यल्प शुल्क आकारले जाते.

दहा महिन्यापुर्वी सुरू झालेल्या या चिकित्सा पध्दतीचा २०९ जणांनी लाभ घेतला असून यामध्ये १२३ स्त्रिया तसेच ८६ पुरूष यांचा समावेश आहे. या योग केंद्राचे विभागप्रमुख म्हणून इंजि. राजेश पाटील कार्यरत असून योगायुर्वेद थेरपिच्या माध्यमातुन डॉ. लीना चौधरी, प्रा. गितांजली भंगाळे यांच्या सहका-याने सहायक योग थेरेपिस्ट म्हणून माधवी तायडे व तुषार सोनवणे हे काम करीत आहेत.

**बातमी नं. २**

जळगाव दि. ४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेत शिक्षणशास्त्र, विद्यार्थी विकास विभाग आणि क्षमता निर्माण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणशास्त्र विभागात दि. ३ जानेवारी ते दि. ९ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येणा-या "आत्मनिर्भर युवती अभियान" या कार्यशाळेचा शुभारंभ करण्यात आला.

या कार्यशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्याती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून करण्यात आले. विद्यार्थिनींना अभ्यासेत्तर उपक्रमात सहभागी होण्यास प्रवृत्त करण्यासाठी आणि त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास व त्यांच्यात विविध अंगाने आत्मनिर्भरता निर्माण करण्याकरीता व त्यांच्यामधील विविध कला गुण विकसित करण्यासाठी विद्यापीठाने आत्मनिर्भर युवती अभियान ही योजना सुरू केली आहे.

पहिल्या सत्रात जळगाव जिल्हा उद्योग केंद्राचे निरीक्षक श्री. अनिल गाढे व ललीत तावडे यांनी "रोजगार निर्मिती/ नवीन उद्योग उभारणीसाठीच्या शासकीय योजना" या विषयावर मार्गदर्शन केले. दुस-या सत्रात व्यवस्थापन प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे यांनी "महिला उद्योजक आणि ई-विक्री" या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या महिला उद्योजक तयार होत असतांना कोणकोणत्या आव्हांनाचा सामना करावा लागतो. व त्यातुन कसा मार्ग काढून यशस्वी उद्योजिका होता येते हे उदाहरणासह स्पष्ट करून सांगितले. या कार्यशाळेत एकुण ४० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. यावेळी प्रशाळेच्या विभागप्रमुख डॉ. मनीषा इंदाणी, डॉ. संतोष खिराडे, डॉ. स्वाती तायडे, कार्यशाळेचे समन्वयक म्हणून डॉ. रणजित पारधे यांनी तर सह-समन्वयक म्हणून प्रणाली सोनवणे यांनी काम केले.

……………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ४ जानेवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता